# महाराष्ट्र शासन

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द,

तालुका:आंबेगाव, जिल्हा: पुणे-४१२ ४०५.

दूरध्वनी क्रमांक: ०२१३३ २३०५८२. संकेतस्थळ:www.gcoeara.ac.in.

फॅक्स क्रमांक: ०२१३३ २३०५८३. ईमेल : office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

**(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)**


जा.क्र.शाअवसंमअ/सा.प्रशासन/२०२४/ 2712 दिनांक: 11 SEP 2024

## कार्यालयीन आदेश

**विषय:** रिट याचिका क्र.५२५७/२०१७- सुरेखा लक्ष्मण सोनावणे विरुद्ध स्टेट ऑफ महाराष्ट आणि इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने उच्च् व तंत्रशिक्षण विभागातर्फे दि. १०-०७-२०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ:** १. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०२४ (प्र.क्र.६६/२४)/ तांशि-५ दि. १०-०७-२०२४.

२.रिट याचिका क्र. ५२५७/२०१७ मध्ये देण्यात आलेले दि.१२-०७-२०२४ रोजीचे आदेश.

३. संचालनालयाचे पत्र क्र.१० एनजीपी/न्या.प्र./परिपत्रक/२०२४/३५८ दि.०७-०८-२०२४.

४.तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे पत्र क्र. तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/३३३९ दि. १६-८-२०२४.

विषयांकित न्यायालयीन प्रकरणी दि. ११-०६-२०२४ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा. न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडुन दि. १०-०७-२०२४ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सदर परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मा. न्यायालयाने दि.१२-०७-२०२४ रोजी आदेश दिले आहेत. सोबत वरिल सर्व नमुद संदर्भिय प्रत जोडल्या आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.१ मधील शासन परिपत्रकातील खालील नमुद निर्देशांचे काटकोर पालन तथा अमंलबजावणीकरिता खालील तक्यात नमुद केल्याप्रमाणे संबधित अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या जबाबदारीसंबंधीत आवश्यक त्या व संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करुन कामकाज करावे असे या कार्यालयीन आदेशाद्वारे कळविण्यात येत आहे.

| अ.क्र. | जबाबदारीचे/निर्देशाचे स्वरुप | जबाबदारी पार पाडणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|
| १. | संदर्भ.क्र. ४ चे परिपत्रक माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत व संस्थेच्या दर्शनी भागात लावणेबाबत. | १.श्री. अतुल चव्हाण, प्रोग्रॅमर<br>२. श्री. एस. पी. पवार, कनिष्ठ लिपीक |
| २. | संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा शासनाच्या योजने अंतर्गत अथवा इतर उपक्रमांतर्गत विमा काढणेबाबत व या संदर्भात शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग , शासन निर्णय दि. २५-०८-२०११ व दि. १६-१०-२०२३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. | १.श्री.एस.एन.आडागळे,वरिष्ठ लिपीक / प्र. प्रबंधक<br>२.श्री. एस. जी. राठोड, कनिष्ठ लिपीक |
| ३. | FIRST AID CUM SICK ROOM मध्ये तातडीने प्रथमोपचाराकरिता आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करणेबाबत. | १.श्री. पी.डी. जाधव, कनिष्ठ लिपीक<br>२. श्री. एस. पी. पवार, कनिष्ठ लिपीक |
| ४. | संस्थेतील सर्व विभागामध्ये तात्काळ प्रथमोपचारासाठी प्रथमोपचार किट उपलब्ध करणेबाबत. | सर्व विभागप्रमखांनी भांडारपाल यांचेकडुन किट उपलब्ध करुन घेणे. |
| ५. | कृत्रिम श्वासोश्वास तसेच इतर तातडीचे प्रथमोपचार देणेबाबतचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत. | डॉ. एम.डी. पांचाळ, रासेयो कार्यक्रम अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ६. | संस्थेच्या जवळपास असलेल्या शासकीय रुग्णालय, शासकीय आरोग्य केंद्र, खाजगी दवाखाने,सार्वजनिक रुग्णवाहिका यांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरात विभागात तसेच दर्शनी भागात लावणेबाबत तसेच संबंधित यंत्रणेशी समन्वय ठेवणेबाबत. | सर्व विभागप्रमुख,<br>मुख्य व उपमुख्य कुलंमत्री, वसतिगृह,<br>प्रभारी सुरक्षा अधिकारी |
| ७. | आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास परिस्थिती हाताळण्यासाठी समन्वयक नेमणेबाबत व त्यांना प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देणेबाबत. | डॉ. एम.डी. पांचाळ, रासेयो कार्यक्रम अधिकारी |
| ८. | संस्थेच्या नजीकच्या दवाखान्याशी तसेच जवळपास राहणाऱ्या डॉक्टरांची ऑन कॉल सेवा उपलब्ध करुन देणेबाबत. | डॉ. डी.के. माघाडे, मुख्य कुलमंत्री<br>डॉ. एच. के. मुनोत, मुलींचे वसतिगृह कुलमंत्री<br>श्री. एन व्ही साळी, मुलांचे वसतिगृह कुलमंत्री |
| ९. | आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास वाहनाची व्यवस्था करणेबाबत. | डॉ. डी.के. माघाडे, मुख्य कुलमंत्री<br>डॉ. एच. के. मुनोत, मुलींचे वसतिगृह कुलमंत्री<br>श्री. एन व्ही साळी, मुलांचे वसतिगृह कुलमंत्री |
| १० | विद्यार्थ्यांकरिता संस्थास्तरावर तणावमुक्तीसाठी कार्यशाळा आणि इतर उपक्रम व विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशक ची व्यवस्था करणेबाबत. | डॉ. एस. व्ही. क्षिरसागर,विद्यार्थी समुपदेशन समिती प्रमुख व इतर सर्व सदस्य |

वरिल सर्व अधिकारी व कर्मचारी यांना या आदेशाद्वारे सुचित करण्यात येते की, संदर्भिय शासन परिपत्रकाचे व वरिष्ठ कार्यालयाच्या संदर्भिय पत्रांचे अवलोकन करुन त्यात नमुद सुचनांचे काटकोर पालन करावे तसेच उपरोक्त नमुद कामकाज जबाबदारीने पार पाडावे. तसेच वरिल नमुद सर्व कार्यवाही करुन संबंधितांनी २४-०९-२०२४ पर्यंत मुद्देनिहाय पुर्तता करुन त्याचा अहवाल निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

**सोबत:** वरिल नमुद संदर्भिय पत्र.

11-9-24

( डॉ.दि.रा.पानगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द,ता.आंबेगाव, जिल्हा-पुणे.

**प्रत:** १. सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी यांना विभागप्रमुख यांचेमार्फत माहितीसाठी.

२. श्री. अतुल चव्हाण, प्रोग्रॅमर यांना सुचित करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना इमेलद्वारे पाठवावे.

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/3330 दिनांक : 16 AUG 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : रिट याचिका क्र.५२५७/२०१७-सुरेखा लक्ष्मण सोनावणे विरूध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र आणि इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे दि.१०.०७.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.**

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/न्या.प्र./परिपत्रक/२०२४/३५८ दि.०७.०८.२०२४
२. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०२४/(प्र.क्र.६६/२४)/तांशि-५ दि.१० जुलै २०२४.
३. रिट याचिका क्र.५२५७/२०१७ मध्ये देण्यात आलेले दि.१२ जुलै २०२४ रोजीचे आदेश

विषयांकित न्यायालयीन प्रकरणी दि.११.०६.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा. न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून दि.१०.०७.२०२४ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मा. न्यायालयाने दि.१२.०७.२०२४ रोजी आदेश दिलेले आहेत. सोबत संचालनालयाचे पत्र, परिपत्रकाची प्रत व मा. न्यायालयाच्या आदेशाची प्रत जोडली आहे.

त्या अनुषंगाने **या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०२ च्या शासन परिपत्रकातील खालील नमुद निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.** तसेच सदर परिपत्रकास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी व संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या दर्शनी भागात लावावे. **याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

१. संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा शासनाच्या योजने अंतर्गत अथवा इतर उपक्रमांतर्गत विमा काढण्यात यावा. या संदर्भात शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दि.२५.०८.२०११ व दि.१६.०१०.२०२३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यावाही करावी.
२. संस्थेत संबंधित प्राधिकरणांच्या मानकांनुसार first aid cum sick room (अंदाजे २० चौ.मी.) क्षेत्रफळ आवश्यक आहे. तसेच सदर रूम मध्ये तातडीने प्रथमोपचाराकरीता आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात यावी.
३. संस्थेतील सर्व विभागांमध्ये तात्काळ प्रथमोपचारासाठी प्रथमोपचार किट उपलब्ध करण्यात यावे.
४. विद्यार्थी तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांकरिता दरवर्षी कमीत कमी एक वैद्यकीय प्रथमोपचार प्रशिक्षण व वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्यात यावे.
५. सदर प्रशिक्षणामध्ये कृत्रिम श्वासोश्वास (Artificial Respiration) तसेच इतर तातडीचे प्रथमोपचार देणेबाबत त्यांना प्रशिक्षित करण्यात यावे.
६. संस्थेच्या जवळपास उपलब्ध असलेल्या शासकीय रूग्णालय, शासकीय आरोग्य केंद्र, खाजगी दवाखाने यांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरात दर्शनीभागात दर्शविण्यात यावेत व त्यांच्येशी समन्वय ठेवण्यात यावा. तसेच शासकीय (१०८) व सार्वजनिक रूग्णवाहिकांचे संपर्क क्रमांक सुध्दा दर्शविण्यात यावेत.

७. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास सदर परिस्थिती हाताळण्यासाठी संस्थास्तरावर एक ते दोन समन्वयक नेमण्यात यावेत. त्यांना प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देण्यात यावे.

८. आपत्कालीन परिस्थितीत सदर समन्वयकांने रूग्णास तात्काळ उपचार मिळण्याच्या दृष्टीने रूग्णालयांशी संपर्क साधावा व आजारी विद्यार्थ्यांस रूग्णालयात भरती करण्यास मदत करावी.

९. संस्थेने संस्थेच्या नजीकच्या दवाखान्याशी तसेच जवळपास राहणाऱ्या/असणाऱ्या डॉक्टरांची On-Call सेवा उपलब्ध करून द्यावी.

१०. आपत्कालीन परिस्थितीकरीता विद्यार्थ्यांना रूग्णालयात नेण्याची गरज भासल्यास संस्थेत वाहनाची उपलब्धतता असावी.

११. विद्यार्थ्यांकरीता संस्थास्तरावर तणावमुक्तीसाठी कार्यशाळा आणि इतर उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशक (Counsellor) ची व्यवस्था करण्यात यावी.

वरील सर्व कार्यवाही करून संस्थाप्रमुख / प्राचार्य यांनी या विभागीय कार्यालयाकडे एका महिन्यात मुद्येनिहाय पुर्तता अहवाल सादर करावा.

सोबत- वरीलप्रमाणे

( डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक हे या कार्यालयाच्या संकेतस्थळावर कायमस्वरूपी निदर्शनास येईल याची दक्षता घ्यावी.